# कोल्हापूर महानगरपालिका
## - संगणक विभाग -

विषय :- Disclosure of Information अंतर्गत प्रसिध्द करावयाची माहिती...

- अधिकारी/कर्मचारी वर्ग -

| नांव | पदनाम | संपर्क क्रमांक |
|---|---|---|
| १) श्री. ज्ञानेश्वर ढेरे | उपआयुक्त (II) | ९७६६५३२०१३ |
| २) श्री. योगेश पाटील | संगणक अधिक्षक | ९९६०८६२२६५ |
| ३) श्री.विष्णू अनंत कराड | वरिष्ठ लिपीक | ९६६५२१२२२१ |
| ४) श्री.निलेश गायकवाड | पवडी कामगार | ७०४०१२०१७० |

१. ई-गव्हर्नन्स् प्रकल्प –

कोल्हापूर महानगरपालिकेकडील विविध विभाग व पाच नागरी सुविधा केंद्रे संपूर्णपणे बांधा, वापरा व मालकीहक्कासह हस्तांतरीत करा (BOOT) या तत्वावर एजन्सीने आवश्यक सर्व हार्डवेअर उपलब्ध करणे, सॉफ्टवेअर विकसीत करणे, आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करणे व अनुषंगिक सर्व खर्च खाजगी एजन्सीने करणे व त्याबदल्यात संबंधित एजन्सीने प्रत्येक ट्रॅन्झॅक्शनला रु.६५/- प्रमाणे चार्जेस याप्रमाणे ई-गर्व्हनन्स पध्दतीचा अवलंब करणेत आलेला आहे. याकामी एचसीएल इन्फोसिस्टीम्स लि. यांची नियुक्ती करणेत आलेली आहे. सदर प्रकल्प १० वर्षे कालावधीकरीता राबविणेत येणार आहे. ई-गव्हर्नन्स प्रकल्पाअंतर्गत (१)घरफाळा विभाग, (२)परवाना विभाग, (३)पाणी पुरवठा विभाग, (४)इस्टेट विभाग, (५)जन्म-मृत्यु नोंदणी विभाग, (६)विवाह नोंदणी, (७)जनसंपर्क विभाग, (८)सार्व.स्वच्छता विभाग, (९)आरोग्य भांडार, (१०)नगररचना विभाग, (११)विद्युत विभाग, (१२)यंत्रशाळा विभाग, (१३)विधी विभाग, (१४)भा.जा.वाचनालय, (१५)अग्निशमन विभाग, (१६)परिवहन विभाग, (१७)संगणक विभाग, (१८)जकात विभाग, (१९)अन्नभेसळ प्रतिबंधक विभाग, (२०)लेखा विभाग, (२१)लेखापरिक्षण विभाग, (२२)कार्मिक विभाग, (२३)सामान्य प्रशासन विभाग, (२४)भविष्य निर्वाह निधी, (२५)पवडी अकौंट विभाग, (२६)उद्यान विभाग, (२७)पवडी प्रोजेक्ट व ट्रॅफिक विभाग, (२८)विभागीय कार्यालये क्र.१ ते ४, (२९)भांडार विभाग, (३०)रेकॉर्ड विभाग, (३१)शिक्षण विभाग, (३२)सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना विभाग, (३३)नगरसचिव विभाग, (३४)आरोग्य दवाखाने इ. मॉड्युल्सचा समावेश आहे. सदर सर्व मॉड्युल्सचे काम पूर्ण झाले असून संबंधित विभागांचे दैनंदिन कामकाज दि.०१/१२/२०१० पासून Go live करणेत आलेले आहे. या प्रकल्पा अंतर्गत महानगरपालिकेची www.kolhapurcorporation.gov.in ही वेबसाईट विकसीत करणेत आली असून त्यावर महापालिकेमार्फत राबविणेत येत असलेल्या विविध प्रकल्पाची तपशिलवार माहिती प्रसिध्द करणेत आलेली आहे. तसेच सदर वेबसाईटवर नागरिकांना

घरबसल्या आपला कर online payment सुविधेद्वारे भरणेची सुविधा उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. तसेच, नागरिकांना मिळकतकर, पाणीपट्टी, परवाना, जन्म-मृत्यु इ. बाबतची सद्यस्थिती पहाणेची सुविधा उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

२. <u>जीआयएस प्रकल्प</u> –

कोल्हापूर महानगरपालिका शहरहद्दीतील मिळकतींचा जी.आय.एस. सर्व्हे करणे व कर वसूलीसाठी ॲप्लीकेशन तयार करणेसाठी (Geo-enabled Property Survey & Implementation of Property Tax Management System) मे सायबरटेक सिस्टिम ॲण्ड सॉफ्टवेअर लि. यांची नियुक्ती केली. सदर यंत्रणेमूळे शहर हद्दीमध्ये करआकारणी न झालेल्या, नवीन बांधकाम झालेल्या, मिळकतीचे वापरामध्ये बदल, बांधकामामध्ये बदल झालेल्या इ.स्वरुपाची अद्ययावत माहिती उपलब्ध झालेमूळे महापालिकेच्या मिळकत कराचे उत्पन्नवाढीसाठी मदत होणार आहे.

३. **<u>स्कॅनिंग ॲण्ड डिजिटायझेशन –</u>**

कोल्हापूर महानगरपालिकेच्या विविध विभागातील महत्वाचे कागदपत्रे स्कॅनिंग व डिजिटायझेशन प्रकल्प राबविण्यात आला आहे. जिर्ण झालेली तसेच इतर सर्व महत्वाचे कागदपत्रे विविध विभागाकडील अभिलेखांचे स्कॅनिंग ॲण्ड डिजिटायझेशन करणेसाठी केंद्रीय भांडार गोवा यांची नियुक्ती केलेली आहे.

४. **<u>ई-ऑफिस –</u>**

महाराष्ट्र शासन राबवित असलेल्या व एनआयसी (National Informatics Centre) यांनी विकसीत केलेली ई-ऑफीस प्रणाली कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये राबविणेत येत असून सध्या सामान्य प्रशासन विभाग, अस्थापना, र.व.का. व ब्युरो विभागामध्ये प्रायोगिक तत्वावर ई-ऑफीस प्रणालीचे माध्यमातून कामकाज सुरु आहे. महानगरपालिकेचे उर्वरित सर्व विभागामध्ये ई-ऑफीस प्रणाली सुरु करणेची प्रक्रीया सुरु आहे.

५. **<u>संगणकीकृत तक्रार निवारण प्रणाली-</u>**

महानगरपालिका पुरवित असलेल्या विविध सेवासुविधा व त्याअनुषंगाने नागरिकांकडून करणेत येणाऱ्या विविध तक्रारी व सुचना इ माहिती नागरिकांना घरबसल्या उपलब्ध करुन देणेच्या अनुषंगाने ही अत्याधुनिक संगणकीकृत सुविधा www.kolhapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. यामध्ये तक्रारी व सूचना मधून ज्या विभागासाठी तक्रारी व सूचना असतील त्या विभागाची निवड करुन तक्रारदाराची संपूर्ण माहिती तसेच तक्रारीचा तपशील केला जातो. तक्रारदाराने केलेली तक्रार व सूचना संबंधीत विभागाकडे पाठवली जाते. तक्रार व सूचना दिल्यानंतर त्या

व्यक्तीस तक्रार नंबर दिला जातो तसेच दिलेल्या मोबाईल नंबर व ई-मेल वर तक्रारीचे Notifications दिले जातात. तक्रार नंबरच्या आधारे त्याचा तपशील याची माहिती मिळते. या अंतर्गत नागरिकांना आवश्यक माहीती तसेच तक्रार नोंदविता येते. तसेच तक्रारीचे निवारण केल्यानंतर संबंधित नागरिकास मोबाईल एसएसएमद्धारे कळविले जाते.

६. **फेस रेकग्निशन सिस्टिम** –

कोल्हापूर महानगरपालिकेच्या विविध विभागाकडे कार्यरत असलेले कर्मचारी व अधिकारी यांचे दैनंदिन उपस्थिती ही यापूर्वी लेखी हजेरी पध्दतीने नोंदविणेत येत होती. तथापि, सदर पध्दतीतील दोष विचारात घेता कार्यालयातील कर्मचाऱ्याच्या कार्यालयीन वेळेत न येणेचे तसेच गैरहजेर राहणेचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आढळून येत आहे. कर्मचारी व अधिकारी कार्यालयीन वेळेमध्ये संबंधित कार्यालयामध्ये उपस्थित नसलेने प्रशासकीय कामकाजामध्ये अक्षम्य दिरंगाई होते. नागरिकांना वेळेवर सेवा उपलब्ध होऊ न शकलेमूळे प्रशासनास नागरीक तसेच नगरसेवक यांचे रोषास सामोरे जावे लागते. सदरची बाब विचारात घेऊन महापालिकेमध्ये फेस रेकग्निशन सिस्टीम कार्यान्वीत करणेत आलेली आहे. याकामी प्रत्येकाच्या हाताच्या बोटांची ठसे स्कॅनींगद्धारे संगणकीकृत करणेत आलेले आहेत. तसेच कर्मचाऱ्यांचे चेहरे स्कॅनिंगव्दारे संगणकीकृत करणेत आलेले आहेत. कर्मचाऱ्यांचे चेहरे व बोटांची ठसे याद्वारे कर्मचाऱ्यांची हजेरी नोंद केली जात असल्यामूळे कर्मचाऱ्यांच्या गैरहजेरीमध्ये लक्षणीय घट होऊन प्रशासकीय कामकाजामध्ये गतीमानता व कार्यक्षमता वाढणेस मदत झाली आहे.